# B.A. Part–I (Semester—I) Examination

## (Literature of Modern Language)

## MARATHI LITERATURE

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :— बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहीत धरली जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण करा : 16

(अ) "देवाची नाई. माह्या मुरल्या छबिल्याची किरपा हाये म्हण....म्या त्याह्यची सोय घेऊन त्याह्यले आसं काटक बनवळां. म्हणून माही किरपा हाये म्हण."

किंवा

"आजच्या उद्याच्या पुरता चारा हाये हा....आता राच्चीच ट्राली घेऊन जातो मंमरूळले. पाह्यतो पैशाचा मेळमाळ....."

(ब) "कशाची दौंडी हाये व वर्षा ? कोण्या महाराजाचं कीर्तन हाये का काय देवळात ?"

किंवा

"तुले सांगायसाठीच बलावलं हेतू करून इकडी; मले काई आता तुपल्या पाण्याची गरज नाई."

(क) "लोभ जीभेचा जळूं दे
दे थिजूं विद्वेष सारा,
द्रौपदीचे सत्त्व माझ्या
लाभुं दे भाषा-शरीरा"

किंवा

"ज्योतींतून धावत या तेज:कण सारे
या यज्ञांतिल अन् सरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणांत मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !"

(ड) "हेमंताचा ओढुन शेला
हळूच ओले अंग टिपावें;
वसंतांतलें फुलाफुलांचें
छापिल उंची पातळ ल्यावें;"

किंवा

"रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे
याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवीत आहे
इथूनच शब्दांच्या हाती फुले ठेवीत आहे
इथूनच शब्दांच्या हाती खड्गे मी देत आहे."

2. 'तहान' या कादंबरीतील बबन शेवाळे या व्यक्तिरेखेतून लेखकाने दुष्काळग्रस्त भागातील तरुण पिढीच्या मनोवृत्तीवर कोणता प्रकाश टाकला आहे ? 16

किंवा

पाण्याच्या टंचाईचा ग्रामीण जीवनाच्या विविध घटकांवर झालेला परिणाम 'तहान' या कादंबरीच्या संदर्भात स्पष्ट करा.

3. (अ) राघोजी शेवाळे या व्यक्तिरेखेच्या आधारे 'तहान' मधील माणूस आणि मुके प्राणी यांच्यातील नाते उलगडून दाखवा. 8

किंवा

'तहान' या कादंबरीमधील लेखनशैलीचे स्वरूप सांगा.

(ब) 'तहान' या कादंबरीतील रामकोरची व्यक्तिरेखा उलगडून दाखवा. 8

किंवा

सदानंद देशमुख याच्या 'तहान' कादबरीतील तुम्हाला आवडलेल्या दोन प्रसंग चित्राचे वर्णन करा.

4. (अ) 'नवा शिपाई' या कवितेतून केशवसुतांनी कोणता संदेश दिला, ते स्पष्ट करा. 8

किंवा

एका सामान्य माणसांची शोकांतिका 'गणपत वाणी' या कवितेतून बा.सी. मर्ढेकरांनी कशी चित्रित केली, ते स्पष्ट करा.

(ब) 'आगगाडी आणि जमीन' या कवितेत कुसुमाग्रजांनी कोणता संघर्ष चित्रित केला, ते स्पष्ट करा. 8

किंवा

खालीलपैकी एका कवितेचे रसग्रहण करा :

(1) झंझावात

(2) माझ्या मना बन दगड

(3) दोन दिवस.

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नातील अचूक उत्तर निवडा :

(1) बबन शेवाळेच्या वडिलाचे नाव काय आहे ? 1

(अ) वसंतराव (ब) लक्ष्मण

(क) राघोजी (ड) संभाजी

(2) बबनच्या प्रेयसीचे नाव काय आहे ? 1

(अ) राधा (ब) रत्ना

(क) यमुना (ड) गंगा

(3) 'तहान' कादंबरीतील शंभर एकराचा कास्तकार कोण ? 1

(अ) शिवराम भुसारी (ब) राघोजी शेवाळे

(क) देवराव बापू (ड) गुलाबराव भालेराव

(4) 'तहान' कादंबरीतील ढाब्यावालाचे नाव काय ? 1

(अ) जगन तुपकर (ब) संभाजी चिकटे

(क) भगवान दोगे (ड) महादेव घेवंदे

(5) 'तहान' कादंबरीतील वर्कशॉप वेल्डींगचे काम करणारा कोण ? 1

(अ) सतीश मंगळे (ब) छगन शेठ

(क) जगदेव ढोरे (ड) कासम भाई

(6) 'तहान' कादंबरीतील वर्तमानपत्राची एजन्सी चालविणारा कोण ? 1

(अ) मोहन काळे (ब) प्रमोद नवले

(क) सुरेश ठोंबरे (ड) राजा उमाळे

(7) 'तहान' कादंबरीतील गावाविकास समितीचा अध्यक्ष कोण ? 1

(अ) पुंजाजी जुमडे (ब) तेजराव मोरे

(क) किशोर तिवाले (ड) अजय कुलकर्णी

(8) 'तहान' कादंबरीतील दंवडी देणारा कोण ? 1

(अ) लक्ष्मण काळे (ब) सुधाकर दाभाडे

(क) यशपाल वरठे (ड) प्रकाश निकम

(9) आधुनिक मराठी कवितेचे जनक कोणास म्हटले जाते ? 1

(अ) इंदिरा संत (ब) भारा तांबे

(क) गोविंदाग्रज (ड) केशवसुत

(10) 'आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे' ही कवितेची रचना कोणत्या कवितेतील आहे ? 1

(अ) तुतारी (ब) नवा शिपाई

(क) आम्ही कोण (ड) हिमलाट

(11) नवकाव्याचे प्रवर्तक कोणास म्हटले जाते ? 1

(अ) गोविंदाग्रज (ब) केशवसुत

(क) केशवकुमार (ड) बा.सी. मर्ढेकर

(12) 'मज लोभस हा इहलोक हवा' ही कविता कोणाची आहे ? 1

(अ) बा.भ. बोरकर (ब) कुसुमाग्रज

(क) नारायण सुर्वे (ड) इंदिरासंत

(13) 'अहि-नकूल' या कवितेची कवी कोण ? 1

(अ) भा.रा. तांबे (ब) मनमोहन

(क) कुसुमाग्रज (ड) दिवाकर

(14) इंदिरा संत यांच्या कोणत्या काव्य संग्रहाला 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार प्राप्त झाला ? 1

(अ) गर्भरेशीम (ब) शेला

(क) मृगजळ (ड) मेंदी

(15) विंदा करंदीकरांचे पूर्ण नाव काय आहे ? 1

(अ) विनायक गोविंद करंदीकर (ब) गोविंद विनायक करंदीकर

(क) महादेव विनायक करंदीकर (ड) सदाशिव बल्लाळ करंदीकर

(16) नारायण सुर्वे यांना कोणती उपाधी दिली आहे ? 1

(अ) समाजवादी कवी (ब) राजकीय कवी

(क) राजकीय कवी (ड) मार्क्सवादी कवी